**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.**

आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग

**Walk in Interview Notice**

इचलकरंजी महानगरपालिका सार्व. बांधकाम विभागाकडील विवक्षित कामकाजासाठी म.न.पा./न.प./सार्व.बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/जिल्हा परिषद इत्यादी शासकीय/ निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उपअभियंता (स्थापत्य) आणि शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचेकडून करार पद्धतीने सेवा उपलब्धतेकामी खालील अटी/शर्तीस अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत.

**अटी / शर्ती**

१) Walk in Interview करिता उपस्थित रहाणा-या तसेच मुलाखत प्रक्रीयेअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारावर महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ०८ जानेवारी,२०१६(महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध व संगणक संकेतांक २०१६०१०७१२१७१४९००७) मधील सर्व अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

२) Walk in Interview करिता उपस्थित रहाणारा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरिक/मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) Walk in Interview करिता उपस्थित राहण्यासाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे इतकी आहे.त्यापेक्षा अधिक वय असणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

४) सद्यस्थितीत आवश्यकतेनुसार उपअभियंता -०१ आणि शाखा / कनिष्ठ अभियंता -०४ यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार असून त्यापेक्षा अधिक उमेदवार पात्र ठरल्यास गुणानुक्रमे निवड करून उर्वरित उमेदवारांचा प्रतीक्षा सूचीमध्ये समावेश केला जाईल.

५) उमेदवाराच्या नियुक्तीसंबंधी तसेच करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही वेळी रद्द करण्याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचा निर्णय अंतिम राहील.

तरी इच्छुकांनी त्यांचे अर्ज व अर्हता/अनुभव विषयक कागदपत्रांसह (मूळ व छायांकित प्रती) दिनांक १९.०७.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. आयुक्त तथा प्रशासक, इचलकरंजी महानगरपालिका यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

जा.क्र.आस्था.व सा.प्र.वि./ ०७/१५४ /२०२४,
दिनांक १० .०७.२०२४

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

**(प्रसाद काटकर)**
उपायुक्त(१),
इचलकरंजी महानगरपलिका.

.....................................................................

जा.क्र.आस्था.व सा.प्र.वि./ ०७/१५५ /२०२४
महानगरपालिका कार्यालय,इचलकरंजी.
दिनांक १०.०७.२०२४

प्रति,
१)प्र.सिस्टीम मॅनेजर,
इचलकरंजी महानगरपालिका.

/- उपरोक्त सूचना महानगरपालिकेच्या www.ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी व तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

२) नाईक हवालदार,

/- उपरोक्त सूचना महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे नोटीस बोर्डवर तसेच शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांचे ठिकाणी प्रसिद्ध करून तसा अहवाल सादर करावा.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

(विजय राजापुरे)
प्र.सहा.आयुक्त,
आस्था. व सा.प्र.विभाग,
इचलकरंजी महानगरपालिका.